या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | रविवार २३ जून २०२४ | अंक१९६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी
नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

# मराठे आधी कोणाच्या अंगावर जाणार नाहीत, पण:.मनोज जरांगेंचा थेट इशारा?

## त्यांचे वाघ आहेत, आमचे पण कुणीतरी असतीलच ना. महाराष्ट्रात रस्त्यावर उतरुन दंगल घडवून आणण्याला छगन भुजबळ जबाबदार असणार



"आम्हाला धक्का लागतोय. त्यांना काय धक्का लागतोय. आमच आम्ही घेणार. आम्ही ओबीसीतील आरक्षण घेणार. राज्य सरकारमध्ये ओबीसी नेत्यांवर दबाव आहे. तेच आंदोलन करायला लावतात, सत्ताधारी म्हणून आम्ही येणार हे सर्व मॅनेज आहे. आमच्या आरक्षणात ते आहेत. त्यांना धक्का लागतोय की नाही हे आम्हाला माहित नाही. आमच्या ओबीसी नोंदी आहेत. हक्काच्या नोंदी आहेत. अर्ध्या तासापूर्वी पुरावे मिळाले आहेत. लाखो नोंदी सरकारने दाबून ठेवल्या आहेत. ब्रिटीश कालीन जनगणनेत मराठा कुणबी दाखवलाय. 1871 मधले पुरावे आहेत. ते ही घेत नाहीत" असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. "छगन भुजबळला स्वत:ची लेकर कळतात, तशी मग दुसऱ्याची लेकर कळायला पाहिजे. धनगर-मराठ्यांमध्ये भांडण लावतायत हे छगन भुजबळने कमी केलं पाहिजे" असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. छगन भुजबळ 100 टक्के दंगल घडवणार. धनगरांनी वाद चिघळू देऊ नये. शेवटी निर्णय तुमचा आहे. त्यांचे वाघ आहेत, आमचे पण कुणीतरी असतीलच ना. महाराष्ट्रात रस्त्यावर उतरुन दंगल घडवून आणण्याला छगन भुजबळ जबाबदार असणार" असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. "भुजबळांच ऐकून वाटोळ करुन घेऊ नका. गोरगरीबांमध्ये भांडण लावण्यापलीकडे काय येतं? धनगर बांधवांना मराठ्यांची नाराजी ओढवून घ्यायला लावतोय हे धनगर बांधवांनी समजून घ्याव" असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## 'मग मी हात बांधून बसू का?'

"आमच्या ओरिजनल नोंदी आहेत. मराठ्यांना आरक्षण देऊ नये, ते खोट आहे, असं कसं म्हणता?. सत्तेत राहून आंदोलन उभी करतो. रस्त्यावर उतरायची भाषा करतो. सरकारमधले लोक मला जातीयवादी म्हणतात, मी कणखर मराठ्यांच्या मागे उभा आहे. हे रस्त्यावर उतरायची भाषा करतात, मग मी हात बांधून बसू का? भांडण लावत असेल, दंगली घडवत असेल, मराठ्यांचे मुडदे पडू देऊ का? माझा मराठ्यांच्या नेत्यांना सवाल आहे. मराठ्यांना आरक्षण मिळू नये, मराठ्यांची पोर मोठी होऊ नये ही भयानक नियत आहे असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## 'छगन भुजबळ काय करायचय ते कर'

"मराठ्यांची मत घेता. बुरखा फाटला आहे. खरे चेहरेबाहेर आले आहेत. मला जातीयवादी ठरवता, मराठा नेत्यांनी थोडं शहाणं व्हायला पाहिजे. ते काय करत नाही. आपण एकटे 50-55 टक्के आहोत. नाईलाज आहे मराठ्यांचा, छगन भुजबळ काय करायचय ते कर, मराठे आधी कोणाच्या अंगावर जाणार नाहीत. मराठ्यांच्या अंगावर आले, तर आम्ही सुद्धा रस्त्यावर उतरणार. चॅलेंज आहे, वाघाची भाषा करतो, मराठा सुद्धा घरात बसणार नाही" असं मनोज जरांगे पाटील म्हणाले

## मुख्यमंत्री शिंदे यांनी माफी मागावी, सामाजिक संघटनेची नोटीस?



शिवसेना ( शिंदे गट) पक्षाचा 58 वा वर्धापनदिन निमित्त वरळी येथील भव्य डोममध्ये मेळावा आयोजीत केला होता. या मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक विधान केले होते. तसेच, भाजपचे कोकण पदवीधर मतदारसंघातील उमेदवार निरंजन डावखरे यांच्यासाठी आयोजित केलेल्या प्रचारसभेतही मुख्यमंत्री शिंदे यांनी त्या विधानाचा पुनरुच्चार केला होता. त्याच्या या विधानावरून मुख्यमंत्री शिंदे यांनी जाहीर माफी मागावी अशी मागणी सामाजिक संघटनेने केली आहे. तसेच, याबाबत त्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना कायदेशीर नोटिसही पाठवली आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी 'महाराष्ट्रात काही अर्बन नक्सल सामाजिक संस्था आहेत. त्या काही अर्बन नक्सल NGOs ने INDIA आघाडीला छुपा पाठिंबा दिला आहे.' असे विधान केले होते. मुख्यमंत्री यांचे हे वक्तव्य बेताल आहे. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे यांनी माफी मागावी अशी कायदेशीर नोटिस पाठवून मागणी करण्यात आली आहे

## छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा,किल्ले धारूर उभारणी प्रकरणी बाळराजे आवारे पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांना जामीन मंजूर.

**धारूर /प्रतिनिधी**

धारूर येथे दिनांक 14 जून रोजी पहाटे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा गनिमी कावा करत उभा केल्याप्रकरणी छत्रपती संभाजी महाराज शौर्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांना अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय,केज यांनी जामीन मंजूर केला. किल्ले धारूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा 14 जून रोजी पहाटे छत्रपती संभाजी महाराज शौर्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील व त्यांच्या सहकाऱ्याच्या वतीने उभा केला होता.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे



स्वप्न गेल्या 35 वर्षांपासून प्रलंबित होते हे स्वप्न छत्रपती संभाजी महाराज शौर्य प्रतिष्ठान यांच्या पुढाकारातून साकार झाले. या सर्व प्रकरणी धारूर पोलिसांनी पोलीस स्टेशन धारूर येथे गु.र.नं.176/2024 विविध कलमानुसार गुन्हा दाखल केला होता. सर्वजन पोलिसासमोर स्वतः समर्पण करून अटक झाले होते. आरोपींनी जामिनासाठी अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय,केज येथे जामीन अर्ज दाखल केला होता. मा.अतिरीक्त सत्र न्यायालय, केज यांनी सर्व आरोपींना प्रत्येकी 25000/- (पंचवीस हजार रुपये) जात मुचलक्यावर जामीन मंजूर केला. जामीन मिळाल्यामुळे किल्ले धारूर शहरातील सर्व समाजातील नागरिकांमध्ये आनंदी आणि उत्साही वातावरण असून, सर्व मावळांच्या किल्ले धारूर शहरात आगमनाची प्रतीक्षा होत आहे. तसेच या बाळराजे आवारे पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांना या जामीनाकामी धारूरकरांनी त्यांच्या न्यायालयीन प्रक्रियेमध्ये भरपूर असे सहकार्य केले तसेच धारूर न्यायालयातील नामवंत वकील बांधवांनी आरोपींच्या वतीने काम पाहिले.

# वटसावित्री पौर्णिमेनिमित्त वृक्षमित्र सुधाकर देशमुख यांच्या कडून महिलांना वृक्षाचे वाटप



**अंबाजोगा ई/प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील वृक्षमित्र व शासनाच्या वन विभाग आणि महसूल यांचा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त सुधाकर देशमुख यांनी वटसावित्री पौर्णिमा निमित्त वडाच्या झाडाची जोडीने पूजा अर्चना करून असंख्य महिलांना वृक्षाचे वाटप केले सुधाकर देशमुख यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे . अंबाजोगाई तालुक्यातील ममदापूर येथील वृक्षमित्र सुधाकर देशमुख व त्यांच्या पत्नी सौ मोहिनी सुधाकर देशमुख यांनी अंबाजोगाई येथील ऐतिहासिक बुर्ज जिल्हा परिषद कन्या शाळा या ठिकाणी असलेल्या वडाच्या झाडाखालीच वटसावित्री पौर्णिमा दिवशी २००६ साली याच वडाच्या झाडाची पूजा अर्चना करून आपला विवाह केला होता जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या अभंगाणे त्यांनी विवाह केला व दरवर्षी वटसावित्री पौर्णिमेला लग्नाचा वाढदिवस निमित्त दर विधीवंत पूजा जोडीने करून या ठिकाणी पूजेसाठी येणाऱ्या प्रत्येक महिलेला वृक्षाचे मोफत वाटप करून दरवर्षी दिलेल्या वृक्षाची वाटचाल व काळजी याची विचार न करता आतापर्यंत विविध जातीचे झाड त्यांची रोप त्यात आवळा, बेल, वड ,पिंपळ, उंबर, रामफळ , आंबा ,चिकू, पेरू ,फणस, डाळिंब ,तुळस, आडुळसा, इ सुमारे अकरा हजाराच्या जवळपास सुधाकर देशमुख व सौ मोहिनी देशमुख त्यांचे चिरंजीव सुमोद देशमुख मुलगी सृष्टी देशमुख यांनी वृक्ष वाटपात सहभाग घेतला होता. वृक्षमित्र सुधाकर देशमुख व सौ मोहिनी सुधाकर देशमुख यांच्या या उपक्रमाचे अंबाजोगाई शहर व ग्रामीण भागातील महिलांनी कौतुक केले आहे.

संपादकीय

## विधवांना उजळमाथ्यांनी जगू द्याहो!

(आंतरराष्ट्रीय विधवा दिन विशेष.)

आज सशस्त्र संघर्ष, विस्थापन आणि स्थलांतर आणि कोविड-१९ साथीच्या आजारामुळे हजारो स्त्रिया नव्याने विधवा झाल्या आहेत आणि इतर अनेक ज्यांचे जीवनसाथी हरवले आहेत किंवा गायब झाले आहेत. विधवांचे अनोखे अनुभव आणि गरजा समोर आणल्या पाहिजेत, त्यांच्यासोबत मार्ग दाखवणारे आवाज बुलंद केले पाहिजेत. भारतात स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने समान दर्जा देण्यासाठी अनेक संघटना आणि समाजसुधारक कार्य करत आहेत. मात्र भारतातील विधवांच्या प्रश्नाकडे डोळेझाक करण्यात येत असल्याचा आरोप होत राहतो.

विधवांना त्यांचे हक्क आणि न्याय मिळवून देण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने २३ जून हा दिन आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. तेव्हा जाणून घेऊया काय आहे विधवा दिनाचा इतिहास, महत्व आणि उद्देश याबाबतची माहिती. काय आहे विधवा दिनाचा इतिहास? कोणत्याही स्त्रिला आपल्या जोडीदार निवडण्याचा अधिकार आहे. मात्र काही कारणास्तव त्यांचा जोडीदार गमावल्याने अशा महिलांना एकाकी आयुष्य जगावे लागते. त्यामुळे विधवा महिलांचे प्रश्न मोठे भयंकर आहेत. विधवा महिलांचा प्रश्न फक्त भारतातच नाही, तर जगभरात गंभीर होत चालला आहे. त्यासाठी गेल्या सात वर्षापासून यूकेची लूम्बा फाउंडेशन ही संस्था जगभरातील विधवा महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात संयुक्त राष्ट्रांमध्ये मोहीम राबवत आहे. विधवांचे प्रश्न बिकट झाल्याने संयुक्त राष्ट्र संघाने २३ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

काय आहे विधवा दिन साजरा करण्याचा उद्देश? जागतिक पातळीवर विधवा महिलांचे प्रश्न भयंकर असल्याने संयुक्त राष्ट्राने २३ जून हा आंतरराष्ट्रीय विधवा दिन साजरा करण्याचे जाहीर केले. त्यानुसार दरवर्षी विधवा दिनाचे औचित्य साधून या दिवशी विधवा महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. जगभरातील विधवा महिलांची स्थिती सुधारावी, त्यांना इतर महिलांसारखे सामान्य जीवन जगता यावे यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करण्यात येतात. इतर सामान्य महिलांसारखे त्यांना समान हक्क मिळण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघ प्रयत्न करते. मात्र आपण कितीही प्रगत झालो, तरी विधवा महिलांकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन बदलत नाही. जागतिकीकृत पातळीवर विधवा महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. पती नसल्याने कुटूंब त्यांच्याकडे विशेष लक्ष देत नाही. तर कधी विधवा महिलांना वाऱ्यावर सोडले जाते. यामुळे जगभरातील लाखो विधवा महिला गरिबी, हिंसाचार, बहिष्कार, बेघरपणा, आजारी आणि समाजातील भेदभाव सहन करतात. विधवाविवाहास आपण सर्वपरीने प्रोत्साहन आणि आटोकाट प्रयत्न केले पाहिजे. जगभरातील ११५ दशलक्ष विधवांना गरिबीत जगण्यास भाग पाडले जाते. तर ८१ दशलक्ष महिलांना शारीरिक शोषणाचा सामना करावा लागत असल्याचे विविध अहवालातून स्पष्ट झाले आहे. जागतिक पातळीवर विधवा महिलांच्या न्याय हक्काचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यात भारततही विधवा महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

# प्रत्येक विद्यार्थ्यांनी अधिकाऱ्याचे स्वप्न ठेवावेत - पी आय मच्छिंद्र सुरवसे

## बाळनाथ विद्यालय चाकरवाडी मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा समारंभ संपन्न...

बीड प्रतिनिधी - बीड तालुक्यातील बाळनाथ विद्यालय या शाळेमध्ये सुरवसे परीवार आणि मित्र मंडळ यांच्या वतीने चाकरवाडीतील दहावी उत्तीर्ण, एनएमएमएस परीक्षेत यशस्वी आणि वेग वेगळ्या क्षेत्रात उंच भरारी घेतलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सुरवसे परीवाराचे तसेच चाकरवाडी गावचे भूषण असणारे पी आय मच्छिंद्र सुरवसे साहेब आणि मित्र मंडळ यांनी या कार्यक्रम आयोजीत केला होता. यावेळी प्रा. फाटक सर, ह . भ.प बाळनाथ महाराज, नेकनूर पोलीस स्टेशनचे प्रभारी एपीआय चंद्रकांत गोसावी साहेब, पीएसआय नितीन गट्टूवार, पीएसआय अर्चना सुरवसे, आदर्श पोलीस पाटील नानासाहेब काकडे, उपसरपंच लखन अनवणे, माजी सरपंच छत्रभुज पवार, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानोबा अनवणे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक कांबळे सर, बाळनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक जगताप सर आणि दोन्ही शाळेचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात ही दिप प्रज्वलन करुन सुरुवात झाली. दिप प्रज्वलन झाल्यानंतर प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक जगताप सर यांनी केले प्रास्ताविकादरम्यान बाळनाथ विद्यालयातील वर्षातून कमीत कमी चार ते पाच विद्यार्थी नोकरीला लागतात असे यावेळी बोलताना शाळेचे मुख्याध्यापक म्हटले आहेत. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहीलेले पी एस आय नितिन गट्टूवार साहेब यांनी बोलताना म्हटले विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा साजरा करणे म्हणजे विद्यार्थ्यांना एक प्रोत्साहन देणे होय. दहावी झाल्यानंतर हा आपला टर्निंग पॉईंट असतो, इथुन पुढे आपल्याला काय करायचे हे स्वतः ठरवायचं असते, ज्या क्षेत्रात आपल्याला आवड असते त्याच क्षेत्राची निवड करुन त्याच क्षेत्रात जावे असे सुद्धा यावेळी बोलताना म्हटले. आदर्श पोलीस पाटील नानासाहेब काकडे पाटील यांनी बोलताना सांगितले की चाकरवाडी ची बाळनाथ विद्यालय ही शाळा परिसराचे भूषण आहे. पीएसआय सुरवसे मॅडम विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी आपल्या मनामध्ये आजच ठरवा आपली जागा कुठे असावी, आपले ध्येय आजच ठरवा, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणे म्हणजे विद्यार्थ्यांचा मनामध्ये अभ्यासाची ओढ लागणे होय. शाळेचा माजी विद्यार्थी बालाजी अनवणे हा बोलताना टॅलेंट तर सर्वच विद्यार्थ्यांमध्ये असते पण ते बाहेर काढण्याच कार्य ते गुरु करत असतात असे यावेळी बोलताना म्हटले. तसेच पुढे कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले नेकनुर पोलीस स्टेशन चे ए पी आय चंद्रकांत गोसावी साहेब यांनी बोलताना फुल रुपाने उबावणारे हे विद्यार्थी आहेत. चाकरवाडी परिसरात माझी निवड झाली हे माझं पूर्वी जन्मीचे पुण्य आहे. माझी सेवा ही माऊली दादांच्या परिसरामध्ये घडते. शाळेचा जर इतिहास पहिला तर खूपच चांगला आहे. आता पर्यंत या शाळेतून जवळपास शंभर विदयार्थी नोकरी साठी घडले आहेत. माझ्या



गावात एकही घर नसेल की त्यागावात नोकरदार नाही. प्रत्येक घरामध्ये एक नोकरदार आहेच. तुम्हाला उच्च शिखरावर नेऊन सोडण्यासाठी शिक्षक आहेत तसेच हा कार्यक्रम ज्यांनी आयोजीत केला ते पी आय मच्छिंद्र सुरवसे यांनी बोलताना एका कार्यक्रमातून पाच विदयार्थी जर यशस्वी झाले तर आपला कार्यक्रम यशस्वी झाला असे म्हणतो. ज्ञानाच्या कप्प्यामध्ये काहीतरी पडले पहिजे या साठी कार्यक्रम ठेवला जातो. प्रत्येक विद्यार्थ्यांनी अधिकाऱ्याचे स्वप्न ठेवावेत. आपले मित्र आणि मैत्रिणी चांगले बनवा, जीवनात आपले मित्र मंडळी चांगले बनवावा हा संदेश विद्यार्थ्यांना सुरवसे साहेब यांनी दिला. मुले घडविण्याचे काम हे आई वडिलांनंतर शिक्षक करतात असा संदेश यावेळी विद्यार्थ्यांना दिला. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषणात प्रा. फाटक सर विद्यार्थी हे फुलणारी उमलानारी आणि देशाचे आधारस्तंभ असणारी पिढी आहे. विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. अश्या कार्यक्रमामुळे विद्यार्थी चांगल्या पद्धतीने विकसित झाली पाहिजेत. मनात जिद्द आणि चिकाटी असली की विदयार्थी कुठेही पोहचवू शकतो. जीवनामध्ये चांगला मित्र असने फार महत्त्वाचा आहे. मित्र हा माणसाला चांगला घडवण्याचे काम असते. मित्राची जागा ही आता मोबाईल ने घेतली आहे. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मांजरे सर यांनी केले. या प्रसंगी बाळनाथ विद्यालयाची परंपरा कायम दिसुन आली आहे. या वर्षी शाळेचा निकाल हा 100 टक्के लागलेला आहे. या वेळी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रत्येक विद्यार्थ्यांचा शाल, हार, नारळ, सन्मान चिन्ह देऊन स्वागत केले. विद्यार्थ्यांबरोबर आई वडिलांचा सुद्धा सत्कार सोहळा केला.शाळेमधून प्रथम संस्कार नेमीनाथ शेळके, द्वितीय अंजली बाबुराव अनवणे , तृतीय धनश्री साहेबराव माने ,सावंत क्षितिजा कानिफनाथ , अनवणे सानिका विजयकुमार ,मोरे सार्थक नवनाथ ,मोरे अंजली मोहन, जगताप अभिजीत समाधान,पायाळ समीक्षा सतिश, जोशी वैष्णवी तुकाराम , सावंत पल्लवी रामचंद्र, सस्ते गीतांजली लक्ष्मण, मानसी अशोक सुरवसे, चव्हाण प्रतीक्षा सुधाकर, वैष्णवी अनिल हजारे तसेच दहावी च्या वर्गातील सर्वच गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ करण्यात आला. तसेच एनएमएमएस परीक्षेत उत्तीर्ण आणि पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचा आणि आई वडिलांचा सत्कार करण्यात आला. या मध्ये, सान्वी गणेश तांदळे, उर्मिला शंकर चव्हाण, प्रियंका गोवर्धन कांदे, श्रुती कदम, शिवम भारत शेळके, विश्वजित नितीन मोरे इतर विद्यार्थी एनएमएमएस परीक्षेत उत्तीर्ण झाल्या बद्दल त्यांचा सन्मान यावेळी करण्यात आला. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्वच विषयात हुशार असलेल्या तेजस ज्ञानेश्वर दाईंगडे आणि प्रगती कांतीलाल पवार या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला आहे. आणि शाळेतील कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या माजी विद्यार्थ्यांपैकी विविध पदांवर काम करत असलेल्या विलास ककडे ग्रामसेवक, नागेश अनवने , गजानन अनवने, महेश पवार, राहुल घोडके फौजी, बालाजी अनवणे यांचा सुद्धा यावेळी सत्कार करण्यात आला आणि शाळेतील माजी विद्यार्थी या वर्षी पोलीस भरती मध्ये भरती झाले होते त्यांच्या आई वडिलांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यामध्ये पोलिस खात्यामध्ये भरती झालेल्या विद्यार्थ्यांच्या आई वडिलांचा सत्कार यावेळी करण्यात आलेला आहे. पोलीस घडवण्यामध्ये आई वडिलांचा सगळ्यात मोठा वाटा असतो. गणेश भाऊसाहेब हजारे आणि नानासाहेब अरुण सुरवसे या विद्यार्थ्यांच्या आई वडिलांचा सत्कार करण्यात आला. तसेच आता नुकताच NEET या परीक्षेचा निकाल जाहिर झाला या परीक्षेमध्ये आदित्य मच्छिंद्र सुरवसे याने 601 गुण घेतले त्या बद्दल त्यांचा आणि आई वडिलांचा सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# पंकजाताई मुंडे चे लवकरात लवकर राजकीय पूनर्वसन करा -आमदार सुरेश धस



**प्रतिनिधी बीड**

पंकजाताई मुंडे यांचा पराभव जिव्हारी लागल्याने अनेक तरुण नैराश्येतून आत्महत्या करीत आहेत त्यांचा बीड लोकसभेत आज पराभव झालेला असला तरी या तरुणांच्या नैराश्येला आणखी काही राजकीय कारणे आहेत त्यामुळे एखाद्या पराभवाने कार्यकर्त्यांनी नैराश्य आलेल्या नाही पक्षांनी होईल तितक्या लवकरात लवकर पंकजाताई मुंडे यांचे पूनर्वसन करावे अशी मागणी आ. सुरेश धस यांनी केली आहे ते बीडमध्ये मध्यामांशी बोलत होते पुढे बोलतानाआ सूरेश धस म्हणाले यापूर्वीही पंकजाताई मुंडे यांचा पराभव झालेला होता त्यानंतर अनेक संधी त्यांना मिळू शकत होत्या पण प्रत्येकवेळी त्यांचे नावाची चर्चा व्हायची आणि त्यांना डावलेला जायचे आज तरुणांच्या मनात जे नैराश्य दाटून आलेय ते एका लोकसभेतील पराभव चे नाही हे गेल्या पाच वर्षात कार्यकर्ते बघत आलेले आहेत त्यामुळे पक्षाने फार काळ आता पंकजाताईंना वाट बघायला लावू नये त्यांचे लवकरात लवकर पूर्ण वसंत करावे अशी मागणी मी करतो असेही आमदार सुरेश धस म्हणाले शिवाय मी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस परदेश चंद्रशेखर बावनकुटे यांच्याकडे देखील त्याची मागणी करणार आहे असेही आमदार सुरेश धस यांनी मांडले



# राज्य शासनाने वक्फ मंडळाला १० कोटी व औरंगाबाद वक्फ मंडळाला २ कोटी निधी

**प्रतिनिधी/नांदेड**


राज्य शासनाने वक्फ मंडळाला 10 कोटी व औरंगाबाद वक्फ मंडळाला 2 कोटी निधीही वितरीत केल्या बद्दल बीड जिल्हा स्व. अमोल भैय्या गलधर युवा मंचच्या वतीने राज्याचे उप मुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा. ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे आभार व्यक्त केले. तसेच वक्फ बोर्डाचा ढिसाळ कारभारामुळे अनेक जागी अतिक्रमण झाले आहे यास कारणीभूत संबंधित



अधिकारी व सदरील कमिटी आहे असा आरोप करत नवीन समिती गठीत करावी व भ्रष्ट अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. तासेच वक्फ बोर्ड मध्ये ज्या प्रलंबित तक्रारी आहेत त्या तत्काळ निकाली काढण्यात याव्यात. अशी मागणी मोहम्मद अझरुद्दीन उर्फ ए. एस. गोलू यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा. ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याकडे केली आहे.

# ब्राह्मण समाजाच्या 30 जूनच्या अधिवेशनात सहभाग नोंदवावा. अनिल बोर्डे

गेवराई :- बीड जिल्हा यजुर्वेदी बंधू भगिनींना विनंती करण्यात येते की, दिनांक



30 जून रविवार रोजी ब्राह्मण समाजाचे छत्रपती संभाजीनगर येथे भव्य अधिवेशन होणार आहे. त्या अधिवेशनाला यजुर्वेदी संघ तर्फे पाठिंबा देण्यात आलेला आहे त्यासाठी आपण सर्व बीड जिल्ह्यातील यजुर्वेदी बंधू-भगिनींनी अधिवेशनास आपली आवर्जून उपस्थित लावावी. त्या अधिवेशनास नोंदणी करावी. आपली प्रत्यक्ष सर्वांची ओळख होईल. तरी सर्व यजुर्वेदी ब्राह्मण समाजाने छत्रपती संभाजीनगर येथील 30 जून रविवार रोजी च्या ब्राह्मण अधिवेशनास सहभागी व्हावे असे आवाहन संस्थापक महाराष्ट्र राज्य यजुर्वेदी संघ अध्यक्ष लक्ष्मीकांत दडके व बीड जिल्हा यजुर्वेदी संघ अध्यक्ष अनिल बोर्डे यांनी आवाहन केले आहे.

# टस्कर हत्तीचा वावर ठरतोय हसणे ग्रामस्थांना त्रासदायक भय इथले संपणार कधी .!



**कुडूत्री/प्रतिनिधी**

हसणे (ता. राधानगरी) येथे टस्कर जातीच्या हत्तीने गेल्या सव्वा महिन्यापासून शेतीमध्ये तळ ठोकला असून टस्कर शेतकऱ्यांचे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान करत आहे. या त्रासाने शेतकरी त्रस्त झाले आहेत. शोधमोहीम राबवून देखील टस्करचा अजूनही शोध लावण्यात वन खात्याला यश आले नाही. लवकरात लवकर या टस्करचा बंदोबस्त करावा अशी मागणी हसणे व हसणे परिसरातून होताना दिसत आहे.

गेल्या सव्वा महिन्यापासून टस्कर हसणे परिसरात वावरत असून टस्करने शेतीचे नुकसान करण्याबरोबर माडाची झाडे, फळ झाडे, चिवे,गवत, याबरोबर भात तरवा पिकांचे प्रचंड नुकसान केले आहे. सध्या शेतीची कामे सुरू होणार असून टस्करच्या भीतीने शेतामध्ये जाणे लोक टाळत आहेत. शेतीची कामे ऐन पावसाळ्यात कशी उरकायची हा एकच प्रश्न शेतकरी व ग्रामस्थ यांचे समोर उभा राहिला आहे.

वन खात्याकडून अनेक वेळा शोध मोहीम राबविण्यात आल्या असल्या तरी या शोध मोहीमाना पुरते यश आलेले नाही. दूरवर हाकलून लावलेल्या टस्कर पुन्हा याच परिसरात येत असल्याने टस्करचा मुक्काम हसणे परिसरात असल्याचे अधोरेखित झाले आहे. हत्तीला हाकलून लावण्यासाठी वनखात्याने वरिष्ठ पातळी वरून उपाय योजना राबवाव्यात टस्कर इथेच का .....!

हसणे परिसर व जंगल परिसर घनदाट असल्याने टस्करला पोषक असणारे खाद्य या ठिकाणी मिळत असल्याने टस्कर याच ठिकाणी स्थिरावला आहे. रात्रीच्या वेळी त्याचा वावर दिसून येत असून पिके फस्त करून नुकसान करत आहे. पुन्हा वावर गांगो माऊली मंदिराच्या परिसरात सव्वा महिना वास्तव्य केलेला हत्ती निघून गेला होता.पण हत्ती पुन्हा परत आल्याने नुकसान करत आहे.शेतकऱ्यांची नुकसान भरपाईची मागणी पुढे येत आहे.



# मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती अचानक खालावली; पुन्हा एकदा त्यांची तपासणी केली जात आहे

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावली आहे. अचानकपणे मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावली आहे. डॉक्टरांकडून मनोज जरांगे पाटील यांची तपासणी सुरू आहे. अचानकपणे प्रकृती खालावल्याने मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा सलाईन सुरू करण्यात आली आहे. मनोज जरांगे पाटील यांना पुढील काही दिवस उपचारांची गरज



असल्याचं डॉक्टरांनी सांगितलं आहे. मनोज जरांगे पाटील यांनी पुढचे काही आरामाची गरज आहे. हॉस्पिटलमध्येच त्यांच्यावर उपचार सुरु ठेवण्याचा सल्ला मनोज जरांगे यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी दिला आहे. मनोज जरांगेंची प्रकृती खालावली मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती अचानकपणे खालावली आहे. डॉक्टरांकडून त्यांची तपासणी केली जात आहे. प्रकृती पाहता मनोज जरांगे यांना पुन्हा सलाईन सुरू करण्यात आली आहे. मनोज जरांगे यांच्या हृदयाची तपासणी सध्या सुरू आहे. टूडी इको, इसीजीसह अत्याधुनिक मशिनद्वारे मनोज जरांगे पाटील यांची तपासणी केली जात आहे. काल बीड दौऱ्यावर गेल्या पासून अस्वस्थ वाटत असल्याचं मनोज जरांगे पाटील यांनी डॉक्टरांना सांगितलं आहे.

# ओबीसी आंदोलन स्थगित होताच पंकजा मुंडे यांची तात्काळ पत्रकार परिषद,

ओबीस आरक्षणाला धक्का लागू नये यासाठी गेल्या दहा दिवसांपासून उपोषणाला बसलेल्या लक्ष्मण हाके यांची समजूत काढायला राज्य सरकारला यश आलं आहे. शुक्रवारी झालेल्या महाबैठकीनंतर आज छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत हाके यांनी हे उपोषण त्यांनी तात्काळ स्थगित करत असल्याचं जाहीर केलं आहे. या उपोषणानंतर पंकजा मुंडे यांनी पत्रकार परिषद घेतली आहे. पत्रकार परिषद पंकजा मुंडे काय म्हणाल्या जाणून घ्या. पंकजा मुंडे काय म्हणाल्या?हाकेंच्या उपोषणाची दखल घेतली आहे. ही चांगली गोष्ट आहे. त्यांनी उपोषण स्थगित केलं. सरकारकडून सकारात्मक उत्तर मिळावं म्हणून त्यांनी उपोषण मागे घेतलं असेल. पण त्यांना पुन्हा उपोषणाला बसण्याची वेळ येऊ नये. हाके आणि वाघमारे यांनी ज्या मागण्या दिल्या, त्यांनी मत आणि मागण्या सांगितल्या आहेत. चुकीच्या पद्धतीने प्रमाणपत्र दिलं आहे,

# महामार्गावर स्कूल बस खड्डयात फसली ;२५ विद्यार्थी बालंबाल बचावले

**पैठण/प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर महामार्गाचे कामाच्या दर्जावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे पंधरा दिवसापूर्वी कवडगाव पुलाजवळ नवीन तयार करण्यात आलेल्या महामार्गावर अचानक जीवघेणा खड्डा पडल्याची घटना ताजी असतानाच गुरुवारी पुन्हा एकदा पिंपळवाडी फाट्याजवळ अचानक खड्डा पडल्याने उभी असलेली शाळकरी मुलांची बस खड्ड्यात कलंडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे .

गुरुवार दि. (२०) दुपारी अडीच वाजता पैठण जैन इंग्रजी शाळेची स्कूल बस एम एच (०४) एफके (१६१८) ही पिंपळवाडी फाट्याजवळ हॉटेल रजनी समोर उभी होती. पालक आपल्या मुलांना घेण्यासाठी आले . काही मुले बसमधून उतरत असतानाच बस अचानक मागच्या बाजूने कलंडली. बसचे मागील टायर अचानक भगदाड पडलेल्या खड्ड्यात रुतले त्यामुळे उभ्या बसचे टायर खड्ड्यात गेले.घाबरलेल्या शाळकरी मुलांनी गोंधळ केल्या ने परिसरातील




ग्रामस्थ धावत आले . पालकांनी व ग्रामस्थांनी तात्काळ मुलांना बस खाली उतरून घेतले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला आहे असे प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे. दरम्यान २८९ कोटी रुपये निधीतून पैठण छत्रपती संभाजी नगर महामार्ग तयार करण्यात येत आहे .संबंधित महामार्गाचे काम बिडकीन पर्यंत जवळपास पूर्ण झाले आहे .मात्र पंधरा दिवसात नवीन बांधण्यात आलेल्या महामार्गावर कौडगाव आणि पिंपळवाडी येथे मोठे जीवघेणे भगदाड पडल्याने कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. -----संथ कामामुळे नागरिक वाहनधारकांचे हाल ठेकेदाराकडून अत्यंत संथगतीने महामार्गाचे काम सुरू आहे .अनेक ठिकाणी पुलाचे कामे अर्धवट असून बिडकीन ते चित्तेगाव पर्यंत खड्डे पडल्याने अवजड वाहनासह चार चाकी वाहनधारक त्रस्त आहेत .वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी ठेकेदाराने तात्पुरता रस्त्याची डागडुजी करावी मात्र ठेकेदार सर्व नियम धाब्यावर बसून रस्त्याचे काम करत असल्याने वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. याकडे राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे. मात्र राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता इंगोले व देखरेख अभियंता यांनी याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे...

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

रविवार २३ जून २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# धमक्या धमक्या खूप देतात. आम्ही कुणालाही धमक्या दिल्या नाही लढण्यासाठी आमचे २ वाघ परत मैदानात पाहिजेत - छगन भुजबळ

## काय म्हणाले छगन भुजबळ ?

यावेळी छगन भुजबळ यांनी उपोषणस्थळी जोरदार भाषण केले. ओबीसींचे दोन वाघ उपोषणाला बसले आहेत. दहा दिवस झाले आहेत. आम्ही मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि इतर काही मंत्री यांच्याशी चर्चा केली. ओबीसी संस्थाचे नेते होते. आम्ही सह्याद्रीवर चर्चा केली. काल ज्याप्रमाणे मिटिंग झाली. गिरीश महाजन, उदय सामंत, धनंजय मुंडे, गुलाबराव पाटील, गोपीचंद पडळकर, माजी खासदार समीर भुजबळ सर्व नेते काल बैठकीला होते. गेले दहा दिवस अनेक ठिकाणी उपोषण सुरू आहे. पुण्यात मंगेश ससाणे आहेत. ठिकठिकाणी आम्ही समजूत घातली.आमचे वाघ परत मैदानात रस्त्यावर हवे आहेत. धमक्या खूप देतात. आम्ही कुणालाही धमक्या दिल्या नाही.शरीफ है हम, किसीसे लडते नही है, मगर जमाना जानता है हम किसी के बाप से भी डरते नही है असे भुजबळ म्हणाले.मला आठवतंय ज्यावेळी आमदारांची घरे पेटवली गेली. मुलाबाळांचे जीव धोक्यात घालवले गेले. हे सर्व झाल्यावर मी आलो मग म्हटलं आता गप्प बसणं शक्य नाही. मंत्रीपदाचाही राजीनामा दिला. मला एक सांगायचं आहे. आमच्या दोन्ही सहकार्यांना चांगलं सहकार्य दिल्याबद्दल तुमचा मी आभारी आहे.



‘ लढण्यासाठी आम्हाला आमचे 2 वाघ पुन्हा मैदानात हवे आहेत. धमक्या खूप देतात. आम्ही कुणालाही धमक्या दिल्या नाही. शरीफ है हम, किसीसे लडते नही है, मगर जमाना जानता है हम किसी के बाप से भी डरते नही है ‘ अशा शब्दांत छगन भुजबळ यांनी इशारा दिला. गेल्या अनेक महिन्यांपासून मराठा आरक्षणाच्या मागणीने राज्याचं राजकारण ढवळून निघालं आहे. मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसीतून आरक्षण द्यावं या मागणीवर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे ठाम आहेत. मात्र मराठा समाजाला आरक्षण देतानाच ओबीसींवर अन्याय होऊ नये अशी मागणी करण्यात येत आहे. आणि याच मागणीसाठी ओबीसी समाजातील नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे हे जालना जिल्ह्यातील वडी गोद्री या ठिकाणी उपोषण करत आहेत. आज त्यांच्या उपोषणाचा 10 वा दिवस आहेत. त्यांनी हे उपोषण मागे घ्याव यासाठी छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेतली. या शिष्टमंडळामध्ये 5 मंत्र्यांसह 12 जणांचा समावेश आहे. छगन भुजबळ, धनंजय मुंडे, गिरीश महाजन, उदय सामंत, गोपीचंद पडळकर, प्रकाश शेंडगे, गुलाबराव पाटील यांच्यासह इतर नेते याठिकाणी दाखल झाले. त्यावेळी छगन भुजबळ यांनी उपस्थितांना संबोधित केले. लढाई अजून संपलेली नाही, असा इशारा देत त्यांनी तूफान फटकेबाजी केली.

## आमचं आरक्षण आमच्या ताटात तसंच राहू द्या

आम्ही काही मागत नाही. आम्ही म्हणतो, आमचं आरक्षण आमच्या ताटातील तसंच राहू द्या. त्यांना दुसरं ताट द्या. आम्ही त्यांना पाठिंबा देतो. आम्ही पाठिंबा दिला. त्यांना वेगळं आरक्षण दिलं. तीन वेळा कायदा आला. आम्ही तीनवेळा पाठिंबा दिला. आरक्षण हा गरिबी हटावचा कार्यक्रम नाही. आदिवासी, दलित समाजातील लोक कलेक्टर झाले, पोलीस कमिशनर झाले. पण आजही झोपडपट्ट्यात दलित आदिवासी राहतात. गरीबी हटली नाही. जे गरीब आहे. पिचलेले आहे. मुख्यप्रवाहाच्या बाहेर आहे, गावागावात अन्याय सहन करत आहेत. त्यांना मुख्यप्रवाहात आणण्यासाठी समान अधिकार देण्यासाठी आरक्षण दिलं आहे. म्हणून बाबासाहेबांनी संविधानातून आरक्षण दिलं. महात्मा फुलेंनी तीनशे वर्षापूर्वी सांगितलं सर्व समान आहेत. जे गरीब आहेत. त्यांना वर आणलं पाहिजे, असं भुजबळ यांनी सांगितलं.

# खरिपाचे खते बियाणे जादा दराने विक्री करणाऱ्या दुकानदारांचे परवाने रद्द करा;अन्यथा आंदोलन छेडू

## भाजपचे माधव पाटील कल्याण यांचा खरमरीत इशारा

नायगाव शहरातील सर्वच कृषी सेवा केंद्र दुकानदाराकडून खरीपाची खते बियाणे शेतकऱ्यांना जादा दराने विक्री करून शेतकऱ्याची प्रचंड लूट करीत असल्याने त्यांच्या दुकानाचे परवाने रद्द करण्यात यावे अन्यथा आंदोलन छेडू असा खरमरीत इशारा भाजपा नायगाव शहराध्यक्ष माधव पाटील कल्याण यांनी तहसीलदारांना निवेदनाद्वारे दिला आहे.

नायगाव शहरासह तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतीची मशागत केल्यानंतर कुठे कुठे लहान मोठा पाऊस झाल्याने 60 ते 70 टक्के पेरणी केली तर काही शेतकरी चांगला पावसाच्या प्रतीक्षेत अजुनही आहेत तर काही शेतकरी आपल्या समस्येत त्रस्त आहेत पण या अडला नारायणला चोही बाजूने आजवर शासन प्रशासन व व्यापारी यांनी कवडी कंगाल केले आहे, शासनाच्या खते बियाणीवर जी ठराविक किंमत असताना त्या किंमतीच्या कितीतरी पटीने खते बियाणेची विक्री शहरातील कृषी सेवा




केंद्र दुकानदारांनी केली आहे, एखादा शेतकरी असे का व कशासाठी असा प्रश्न केल्यानंतर सदर दुकानदार म्हणतात तुम्हाला खते बियाणे घ्यायचे असेल तर घ्या अथवा नको घ्या पण तुम्हाला कुठेही हीच किंमत द्यावी लागेल, अशी शेतकऱ्याची लूट होताना त्यांची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे एवढे करूनही भविष्यात शेती पिकली नसेल किंवा चांगला शेतीमालाला भाव मिळत नसेल तर आत्महत्याच हाच पर्याय शेतकऱ्यांसमोर आहे, म्हणून शासन भावाप्रमाणे खते बियाणेची विक्री न करता जादा दराने विक्री करून तिजोऱ्या भरणाऱ्या दुकानदारांचे परवाने रद्द करावे अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडू असा रोखठोक इशारा भारतीय जनता पार्टीचे नायगाव शहराध्यक्ष माधव पाटील कल्याण यांनी नुकतेच नायगाव तहसीलदार यांना दिला आहे, देण्यात आलेल्या निवेदनावर माजी नगरसेवक देविदास पाटील बोमनाळे, भाजपा युवा शहराध्यक्ष राजू बेळगे, सौ.सोनालीताई हंबर्डे, सामाजिक कार्यकर्ते बळीराम पाटील वडजे, जुनेद पठाण ओमकार पांचाळ यांच्याही स्वाक्षरी आहेत. गारा वारा ऊन सोसुन मातीतून सोनं पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनी साप विंचू विजा मुळे कित्येकांनी जीव गमावले तर असंख्य शेतकरी शेतीमालाला अपुरा भाव व शेतीला अपुऱ्या सुविधा मिळत असल्याने या दुखीत शेतकऱ्यांच्या दुःखावर मीठ चोळणाऱ्या कृषी सेवा केंद्र दुकानदाराचे परवाने रद्द होतील काय हा प्रश्न निवेदनकर्त्या पुढे आहे.

## आंदोलन स्थगित केलंय थांबवलं नाही, उपोषण सोडल्यानंतर काय म्हणाले लक्ष्मण हाके



ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी आपलं अखेर उपोषण सोडले आहे. सरकारच्या शिष्टमंडळाने आज उपोषण सुरु असलेल्या ठिकाणी भेट देत सरकारचं म्हणणं मांडलं. सरकारच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या चर्चेनंतर आम्ही सरकारला सकारात्मक प्रतिसाद देत असल्याचं हाके यांनी म्हटलं आहे. गेल्या दहा दिवसांपासून हाके यांचं उपोषण सुरू होतं. शासनाचं शिष्टमंडळाला उपोषण मागे घेण्यास यश आलं आहे. उपोषण सोडल्यानंतर लक्ष्मण हाके म्हणाले की, ‘एक-दोन मागण्या सोडल्या तर बाकीच्या मागण्यावर सरकाराने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. शासनाचं शिष्टमंडळाला विनंती आहे. गेल्या तीन वर्षापासून पंचायत राजमधील आरक्षण पेंडिग आहे. आमचे ५६ हजार गावे वंचित आहे. एक हजार पंचायत सदस्य भेटून गेले आहेत. शासनाने कोर्टात काही विनंती केली पाहिजे. हे आंदोलन तात्पुरतं स्थगित करत आहोत. सरकारला आम्ही सकारात्मक प्रतिसाद देत आहोत. याचा अर्थ आम्हाला कळत नाही. त्याला डावललं जात आहे हे समजू नये. पुढच्या आंदोलनाची दिशा ठरवू. आताचं आंदोलन स्थगित करत आहोत.’

# सुनंदाताई राजेंद्र पवार यांच्या वाढदिवसा निम्मीत जि.प. शाळा मस्साजोग येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप




## मिथून मनोहरराव देशमुख यांच्या हस्ते वाटप करण्यात आले

**केज/प्रतिनिधी**

जि प मा शाळा मस्साजोग येथे सुनंदाताई राजेंद्र पवार यांच्या वाढदिवसा निम्मीत शाळेतील इयत्ता १ ली ते ९ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थी याना स्टीफीन डबा स्टीफीन बॅग पाणी बॉटल यांचे वाटप मिथून मनोहरराव देशमुख यांच्या हस्ते वाटप करण्यात आले या कार्यक्रमाला शाळेतील मुख्याध्यापक श्री कोथींबीरे सर शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सचिन सोनवणे उपाध्यक्ष श्रीकांत सोनवणे सदस्य भिमराव गायकवाड संदीप देशमुख राहूल देशमुख अप्पासाहेब मोरे प्रमोद देशमुख रविंद्र देशमुख अण्णासाहेब गायकवाड राजेश भैय्या सोनवणे उद्योजक प्रमोद देशमुख ग्रामसेवक गव्हाणे साहेब शिंदे सर बनकर सर जाधवसर इंगोलेसर केदार सर श्रीम बनसोडे मॅडम सोनार मॅडम पिसे मॅडम देवगुडे मॅडम गदळे मॅडम केदार मॅडम व सर्व शिक्षण प्रेमी नागरीक उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com